# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## PER BOARD EXAMINATION-3(2025-26)
## MARATHI – SET 2

Class : X
Date : .01.2026
Admission No.:

Duration : **3** Hrs
Max. Marks : **80**
Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) या प्रश्नपत्रिकेत अ, ब, क, ड असे चार विभाग आहेत.

(2) सर्व विभाग आवश्यक आहेत.

(3) यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.

(4) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

---

### विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 2 (आकलन ) अपठित पद्यांश :–**

**प्र 2 (अ) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

**प्र 2 (अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा :–(कोणतेहीचार(4X1=4)**

कुंभारा सारखा गुरु नाही रे जगात
वरि घालितो धपाटा, आत आधाराला हात
आधी तुडवी तुडवी मग हाते कुरवाळी
ओल्या मातीच्या गोळयाला येई आकृती वेगळी
घट जाती थोराघरी,घट जाती राऊळात
कोणी चढून बसतो गावगौरीच्या मस्तकी
कुणी मदयपात्र होतो रावराजाच्या हस्तकी
आव्यातली आग नाही पुन्हा आठवत
कुणी पुजेचा कलश, कुणी गोरसाचा माठ
देता आकार गुरुने ज्याची त्याला लाभे वाट
घट पावती प्रतिष्ठा गुरु राहतो अज्ञात

1 कुंभारासारखा गुरू नाही रे जगात शब्दयोगी अव्यय शोधा?
- **अ** सारखा
- **ब** नाही
- **क** रे
- **ड** गुरू

2 कुंभाराच्या उदाहरणावरून कवीला कोणाचे महत्त्व सांगायचे आहे?
- **अ** शिष्याचे
- **ब** गुरूचे
- **क** कुंभाराचे
- **ड** नशिबाचे

3 दूध या अर्थाचा कोणता शब्द कवितेत आला आहे ?
- **अ** कलश
- **ब** माठ
- **क** गोरस
- **ड** घट

4 कलश कशासाठी उपयोगात आणला जातो ?
- **अ** पूजेसाठी
- **ब** पाणी भरण्यासाठी
- **क** दूध ठेवण्यासाठी
- **ड** झाडे लावण्यासाठी

5 खालील पैकी कोणत्या ठिकाणी घट जात नाही?

अ थोरा घरी | ब राऊळात
क राजाच्या हातात | ड गवळणींच्या मस्तकावर

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** आधी तुडवा तुडवी झाल्यावर नंतर काय होते?
**2** कोणासारखा गुरू जगात नाही असे कवी म्हणतात?
**3** गुरूने आकार देताच काय घडले?
**4** कशाला आकृती प्राप्त होते?
**5** कोण अज्ञात राहतो ?

**प्र 1 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश :–**

तथागत गौतम बुद्ध कोणत्याही प्रसंगी शांत,प्रसन्न असत. त्यांच्या या गुणांमुळे लोक त्यांना खूप मान देत, पण काही विरोधकांना हे सर्व सहन होत नसे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवण्यास भाग पाडायचे, त्यांचा अपमान करायचा या उद्देशाने त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला.

खूपच लोक जमले होते. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेव्हा या माणसाने तेथे शिव्या दिल्या. जमलेले लोक खूप अस्वस्थ झाले, संतापलेही, त्याला मारायलाही धावले. पण तथागत मात्र शांत होते .त्यांनी लोकांनाही शांत केले. त्याच्या चेहऱ्यावरील हास्य ही तसेच होते. तो माणूस अद्वा–तद्वा शिव्या शाप देत होता. बऱ्याच वेळाने तो थकून थांबला आणि डोळे ताणून गौतमांकडे पाहत राहिला. तथागत शांत स्वरात म्हणाले, मी तुला एक प्रश्न विचारू का? विचारा तो माणूस गुरगुरला जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?

इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणाऱ्याकडेच राहिल. तो माणूस म्हणाला. अगदी बरोबर!तथागत स्मित करीत म्हणाले, मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला, तर ते कोणाकडे राहतील? तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्याच्या स्तुती–शापांचा स्वीकार करणे न करणे हे पूर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वतःचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो, अन्यथा ते केवळ शब्दांचे बुडबुडे असतात . कार्यालयात, समाजात किंवा अन्य ठिकाणी वावरताना हे जर लक्षात ठेवले तर माणसाचा त्रास खूपच कमी होऊ शकतो.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडाः–(कोणतेही पाच)** **(5X1=5)**

**1** गौतम बुद्ध कोणत्याही प्रसंगी कसे असत?
**अ** शांत व धैर्यवान | **ब** शांत व कार्यशील
**क** शांत व प्रसन्न | **ड** शांत व क्रोधीत

**2** लोक त्यांना का मान देत ?
**अ** गुणांमुळे | **ब** आदरामुळे
**क** चांगुलपणामुळे | **ड** प्रेमामुळे

**3** लोकांच्या कोणत्या गोष्टींचा स्वीकार करणे न करणे हे आपल्या हाती असते?
**अ** कौतुकाचा | **ब** रागाचा
**क** स्तुती–शापांचा | **ड** ग्रथसंपदा

**4** सुन्न झालेल्या विरोधकांची प्रतिक्रिया काय होती ?
**अ** त्यांनी तथागतांना नमस्कार केला. | **ब** तो तथागतांच्या चरणी लागला.
**क** त्याने तथागतांची क्षमा मागितली. | **ड** तो रडू लागला.

**5** प्रवचनात तथागत काय करत होते ?
**अ** भजन कीर्तन | **ब** भाषण
**क** समुदायाला मार्गदर्शन | **ड** समुदायाची कानउघडणी

**6** तो माणूस ––––– शिव्याशाप देत होता.

अ विनाकारण　　　　　　　　　　ब रागावून

क उगाचच　　　　　　　　　　　ड अद्‌वा–तद्‌वा

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 विरोधक कोणत्या उद्‌देशाने तथागतांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला?

2 जनसमुदायातील काही माणसे त्या विरोधकाला मारायला का धावली?

3 आपण कशावर नियंत्रण ठेवू शकत नाही?

4 गौतम बुद्‌ध यांच्या विरोधकांना काय सहन होत नसे?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 खालील पर्यायातून सामान्य नामाचा योग्य पर्याय निवडा :–

अ रमा　　　　　　　　　　ब सुदामा

क नदी　　　　　　　　　　ड राम

2 पुढे दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत?

अ नाम म्हणजे वस्तू किंवा पदार्थाचे नाव होय

ब नाम म्हणजे वास्तव किंवा काल्पनिक वस्तूंचे नाव होय.

क नाम म्हणजे प्राणी,व्यक्ती यांची नावे व त्यांच्या अंगी असणारे गुण होय.

ड नाम म्हणजे वस्तूविषयी विशेष माहिती सांगणारा शब्द होय.

1 विधान अ–ब–क बरोबर ड चूक.　　　　2 विधान अ–ब–ब बरोबर ड चूक

3 विधान ब–क–ड बरोबर अ चूक　　　　4 विधान क–ड बरोबर अ–ब चूक

3 खालील पैकी गटात न बसणारे वाक्य कोणते?

अ देशासाठी वीरांनी प्राणार्पण केले　　　　ब गावाबाहेर जत्रा भरली

क गोगलगाय हळू चालते　　　　ड सूर्य ढगामागे लपला.

4 पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा वापर करा.

आईला थोडे बरे नाही,–––– सर्व ठीक आहे.

अ आणि　　　　　　　　　　ब की

क किंवा　　　　　　　　　　ड बाकी

5 वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

जीत <u>गटागटा</u> दूध पितो.

अ क्रियाविशेषण अव्यय　　　　ब सर्वनाम

क विशेषण　　　　　　　　　　ड शब्दयोगी अव्यय

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 तुला परीक्षेत चांगले यश मिळेल.( वाक्याचा काळ ओळखा).

2 अभिषकने पायाचे ठसे पाहिले. ( भविष्यकालिन वाक्य तयार करा)

3 माणसाने भूतदया अंगी बानवावी.( वर्तमानकालीन वाक्य तयार करा )

4 विशाखा पुस्तक वाचत आहे .(भूतकालीन वाक्य तयार करा )

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 मुलांना अभ्यासाची काळजी नको का? ( वाक्याचा प्रकार ओळखा)

2 दिवेश जबाबदार मुलगा आहे.( नकारार्थी वाक्यात रुपांतर करा )

3 देवा,सर्वांना सुखी ठेव! . ( वाक्याचा प्रकार ओळखा)

4 निसर्गाला कुठलाही धर्म नाही.( प्रश्नार्थक वाक्य तयार करा)

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 खालील पैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

1 धेनू–धरती　　　　　　　　2 ऊब–आग

3 उदक–उदर　　　　　　　　4 प्रण–प्रतिज्ञा

2 खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

**अ** मुख **ब** सोंड

**क** वदन **ड** तोंड

3 खालील समानार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा?

**अ** माती–मृदा **ब** राणी–राज्ञी

**क** जग–विश्व **ड** कान–नासिका

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालील पैकी विरूध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती?

**अ** समान×भासमान **ब** सुरूप×अनुरूप

**क** मागील×खालील **ड** स्वच्छ×अस्वच्छ

2 **प्राचीन** या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा :–

3 **सुशिक्षित** या शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा :–

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा?

**अ** कोकीळ **ब** सांडणी

**क** लांडोर **ड** सिंहीण

2 **गौळी** या शब्दासाठी स्त्रीलिंगी शब्द कोणता?

3 लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द कोणता?

**अ** नर **ब** पुरूष

**क** मानव **ड** स्त्री

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालील पैकी निश्तिपणे अनेकवचनी शब्द कोणता ?

**अ** मुलगी **ब** मुलगा

**क** मुली **ड** मूल

2 खालील पैकी एकवचनी शब्द कोणता ?

**अ** कागद **ब** वाट

**क** दिवस **ड** पुरूष

3 **तारीख** या शब्दाला अनेकवचनी शब्द लिहा.

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

1 खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

**अ** सत्यासत्य **ब** मागेपुढे

**क** मीठभाकर **ड** खरेखोटे

2 खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

**अ** आईबाबा **ब** राधाकृष्ण

**क** मीरामाधव **ड** पंचपाळे

3 या समासाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थाचा समावेश केलेला असतो अशा समासाला काय म्हणतात.

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 रा.ग. जाधव यांनी सगळया शाली कोणाला वाटल्या?

2 पंतांचा अत्यंत कुचकट शेजारी कोण ?

3 तपोवनातील स्त्रियांना अब्दुल कशासारखा वाटायचा?

4 अभिषेकच्या मामेभावाचे नाव काय?

5 भावे सर लेखकास कोणता विषय शिकवत.

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भराः–   (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 आयुष्याचे फार मोठे –––––– मला भावे सरांच्या शिकवणुकीतून गवसलं.

2 तो आय.आय.टी –––––– ला शिकत होता.

3 अन्वर ––––––– हट्ट धरून बसला.

4 ––– रस मला अमृता सारखा वाटू लागला.

5 सुर्वे मुळातच –––– होते.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः–** **(1X3=3)**

1 रंग साहित्याचे या पाठाच्या आधारे तुम्हाला आवडलेल्या साहित्यप्रकाराचा परिचय करून दया –

2 माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान यावर तुमचे विचार व्यक्त कराः–.

3 फूटप्रिन्ट ॲपबद्दलचे तुमचे मत सांगा?

**प्र 5 ङः–खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते ओळखून वाक्य पुन्हा लिहाः–** **(5X1=5)**

**(खूप आनंद वाटणे, रिकामा वेळ न मिळणे, निपुण असणे, नाराजगी व्यक्त करणे, प्रेमाने जवळ घेणे)**

1 असं म्हणून गुरुजींनी निरंजला हृदयाशी धरले.

2 ज्ञानपीठ पुरस्कार ययाति या कादंबरीला मिळाला, तेव्हा मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरुन आला.

3 बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दल आपली मळमळ व्यक्त केली.

4 मला काही कामामुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही,

5 वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः–  ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 कवीच्या मदतीला धावून येणारा मित्र कोण?

2 कवी सर्वार्थाने कोणाला शरण आला आहे?

3 संत नामदेवांनी मेघाची उपमा कोणाला दिली आहे?

4 कवी हरघडी कोणाचा विचार करतो आहे?

5 हरणी केव्हा चिंतीत होते?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 अग्निमाजि पडे बाळू। माता धावे –––––––।।

2 दुनियेचा विचार हरघडी केला, अगा –––––झालो.

3 वनवा लागलासे वनी। ––––––चिंतीत हरणी

4 काय करावे –––– नाही कष्टाचे सामार्थ्य.

5 नामा म्हणे मेघा जैसा। विनवितो –––– तैसा।।.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः–(कोणतेही एक)** **(1X3=3)**

1 हरघडी अश्रू वाळविले नाहीत ,पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन मदतीला आले

**किंवा**

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करुया जयजयकार।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :–  ( कोणतेही पाच )** **(5X1=5)**

1 तुप्प हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे?

2 ताकास तूर न लागू देणे या वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे?

3 डॉ. काकोडकर यांनी किती वर्षांपूर्वीचे अनुभव सांगितले आहेत?
4 फारसी भाषेतून कोणता प्रत्यय आला आहे?
5 बार्कचे विस्तारित रुप लिहा?
6 व्युत्पत्ती कोशाचे पहिले कार्य लिहा?

**विभाग– ड लेखन– (गुण 15)**

**लेखन**

**प्र 8 (अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 ते150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा :– (कोणतेही एक) (1X5=5)**

**निबंधविषयक मुद्दे**

**1 भारतीय सैनिकाचे मनोगत**

मुद्दे:–बालपण सुखात––सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न––योग्य प्रशिक्षण–– सेवेसाठी बांग्लादेश सीमेवर रूजू–––शत्रूचे भारतीय हद्दीत अतिक्रमण––जोरदार युद्ध––मरणासन्न अवस्था–– भारतमातेसाठी प्राणार्पण करण्याची वेळ––भारतमातेची अजून सेवा करू शकत नाही याचा खेद–– जयहिंद.

**2 चित्रपट बंद झाले तर ......!**

**मुद्दे :–** करमणुकीचे साधन –––चित्रपट बंद केले तर होणारे परिणाम –––चित्रपटामुळे होणारे फायदे तोटे–––कलात्मक चित्रपट हवेत.

**3 निसर्ग माझा सोबती**

मुद्दे :– वातावरणातील चैतन्य––निसर्ग व मानवाचा संबंध–––मानसाचे निसर्गावरील प्रेम–––माणूस निसर्गाचा नाश करतो–––संरक्षणाची जबाबदारी–––– मानवाचे कर्तव्य.

**किंवा**

**कथाविषयक मुद्दे. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)**

**1 मुद्दे :–** संध्याकाळची वेळ––––––खूप गर्दी–––श्रीमंताचे पाकीट पडणे–––गरीब विदयार्थ्याला सापडणे––––पाकीट मुख्याध्यापकांना देणे––श्रीमंताचे शाळेत येणे ––प्रामाणिकतेचे फळ –––तात्पर्य .

**2 मुद्दे** एक कुत्रा––भटकताना भाकरी मिळणे––––भाकरी घेऊन पूलावरुन जाणे–––पाण्यात स्वतःचेच प्रतिबिंब पाहणे–––आजून भाकरीचा लोभ होणे––––––दुसरा कुत्रा समजून भुंकणे–––भाकरी गमावणे––––––तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( लिफाफा आवश्यक) ( कोणतेही एक ) (1X5=5)**

राधा / रमन चव्हाण,आदर्श महाविदयालय,पवनानगर,शिंदेवाडी,जि. सातारा येथून शाळेत वर्गसजावट करण्यासाठी आवश्यक असलेल्या सजावटीच्या साहित्याची मागणी करणारे पत्र विविधा व्हरायटीज,रविवार पेठ,सावतामाळी चौक,सातारा यांना लिहित आहे..

**किंवा**

संगीता / संजय पाटील राहणार आकाश पॅरडाईज, राजवाडा मार्ग,मुंबई –10 येथून त्यांच्या विभागात अनियमित व कमी पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार मुंबई महानगरपालिका,पाणीपुरवठा विभाग यांना पत्राद्वारे करत आहे.

**प्र 8 (क)खालील दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन करा:– (1X5=5)**

1 शालेय गणवेशाच्या दुकानाची जाहिरात तयार करा –

**किंवा**

2 घडयाळाच्या दुकानाची जाहिरात तयार करा :–

**:::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::::**